फळबाग केंद्र निळेली तालुका कुडाळ येथे रोजंदारीवर कार्यरत असलेल्या सहा रोजंदारी मजुरांना सेवेत कायम करून त्यांना कायमपणाचे फायदे देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांकः- न्यायप्र २०१७/६८३/प्र.क्र.१३७/१३ अे,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ०७ मे,२०१९

<u>संदर्भ</u> :-१) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२, दि.१७-०४-२०१५.
२) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/युएलपी क्र.२५/९३/रि.पि.१३२०/ १०/प्रक्र.२३/आस्था- ४/०९, दि. ०२-०१-२०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

मा. औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथील तक्रार युएलपी क्र. २५/१९९३ मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट पिटीशन क्र. १३२०/२०१० राज्य चतुर्थश्रेणी सहकारी कर्मचारी संघटना, मुंबई विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी मा. औद्योगिक न्यायालयाच्या दि. १/१२/२००८ च्या निर्णयानुसार सहा मजुरांना दि.१/२/१९९३ पासून सेवेत कायम करून त्यांना दि.१/१२/२००८ पासून दि. ३१/५/२०१८ अखेर/सेवा निवृत्तीच्या दिनांकापर्यंत देय होणाऱ्या रू. ७५,१५,७७३/- रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

१. सदर प्रकरणी, न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करण्याशिवाय पर्याय नसल्यामुळे, सहा मजुरांपैकी सेवानिवृत्त झालेल्या चार मजुरांकरिता ४ अधिसंख्य पदे दि. १/२/१९९३ पासून ते सदर मजुरांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत निर्माण करून त्या पदावर सदर चार मजुरांना काल्पनिकरित्या सामावुन घेण्यात यावे.

२. सेवानिवृत्त न झालेल्या दोन मजुरांना रिक्त पदावर सामावुन घ्यावयाचे असल्याने त्यांचेकरिता दि. १/२/१९९३ पासून ते त्यांना रिक्त पदावर नियुक्ती देण्याच्या तारखेपर्यंत दोन अधिसंख्य पदे निर्माण करून त्या पदावर त्यांना काल्पनिकरित्या सामावुन घेण्याची कार्यवाही करावी . तथापि ज्या रिक्त पदावर सदर दोन मजुरांना सामावुन घ्यावयाचे आहे, ती रिक्त पदे जर सहा महिन्यांहुन अधिक काळ रिक्त राहील्यामुळे व्यपगत झाली असतील तर ती पदे पुनरूज्जिवित करण्यास कार्योत्तर मंजुरी घेण्याची दक्षता घ्यावी.

३. मात्र सदर मान्यता दिलेल्या रिक्त पदांपैकी किमान दोन पदे वरिल अधिसंख्य पदे कार्यरत असेपर्यंत भरण्यात येऊ नयेत या अटीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी सहा रोजंदारी मजूरांना दि.०१.१२.२००८ ते दि.३१.५.२०१८ अखेर / सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत देय होणारी एकूण रु.७५,१५,७७३/- रक्कमेस, वित्त विभाग शासननिर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३ विनियमन भाग-२ दि. १७ एप्रिल २०१५ अन्वये प्रसिध्द केलेले वित्तिय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग दोन महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेले वित्तिय अधिकार अ.क्र. २, नियम क्र.७ अन्वये प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

५. या वरील खर्च भाजीपाला रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उद्याने (अनिवार्य/ योजनेत्तर) (२४०१ १७२२) या लेखाशिर्षाखाली २७- लहान बांधकामे बाबीखाली सन २०१९-२० साठी मंजूर केलेल्या तरतूदीतून करण्यात यावा.

६. सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३४/आपुक, दि.११-०३-२०१९ अन्वये मान्यतेनंतर निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०७११४२१२४१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.05.10 12:34:07 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. प्रशासन अधिकारी, आस्थापना-३, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पूणे-५
४. विभागीय कृषी सहसंचालक,कोकण विभाग,ठाणे
५. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सिंधुदुर्ग
६. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
७. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
८. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०. सहसंचालक लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन,५ वा मजला,मुंबई -३२,
११. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१२. निवड नस्ती (१३-अे)